शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## पंचनाम्याचे नाटक आणि शेतकऱ्यांची फसवणूक; काँग्रेसचा सरकारला इशारा

### ओला दुष्काळ घोषित करा, अन्यथा मंत्र्यांना रस्त्यावर फिरु देणार नाही - हर्षवर्धन सपकाळ

**जालना | प्रतिनिधी -** राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टी व ओल्या दुष्काळामुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. मात्र सरकारकडून अजूनही ठोस निर्णय न घेता फक्त पंचनाम्याचे नाटक केले जात आहे. शेतकर्यांच्या मूलभूत मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यास मुख्यमंत्री व मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जालन्यात गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी जालन्याचे खासदार डॉ.कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलतानी दिला.

सकाळी पैठण व अंबड तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. शेतकर्यांच्या जखमांवर सरकार मीठ चोळण्याचे काम करत आहे. मंत्री आणि उपमुख्यमंत्री शेतकर्यांच्या शेतात फक्त फोटोशेशन करण्यासाठी जातात. पंचनाम्याच्या नाटकाने शेतकर्यांना फसवले जात आहे. जनतेच्या दुःखावर राजकारण करणार्या या सरकारचा निषेध केला पाहिजे.

राज्यातील २८८ पैकी तब्बल २४० आमदार सरकारच्या पाठीशी असतानाही शेतकर्यांसाठी ठोस निर्णय घेण्यात अपयशी ठरत आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली. शेतकर्यांच्या पोटावर पाय देणारे सरकार जनतेच्या हिताचे नसल्यांही त्यांनी म्हटलं. राज्यात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकर्यांना कर्जाचा तगादा लावू नये व तत्काळ कर्जमाफी करावी, पंचनामा न करता थेट आर्थिक मदत द्यावी, शेतकर्यांना दसरा होण्यापूर्वी हेक्टरी ५० हजार रुपये द्यावेत, ज्यांची शेती वाहून गेली त्यांना एकरी ५ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, पुढील काळात सरकारनेच शेतकर्यांना माफत बी-बियाणे आणि कीटकनाशके उपलब्ध करून द्यावीत असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलंय. राज्यातील ३०० पेक्षा अधिक तालुक्यांमध्ये तिप्पट पाऊस झाला असून शेतकर्यांचे उत्पन्न आणि जमीन मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. तरीदेखील सरकारने ओला दुष्काळ घोषित केलेला नाही. शिवाय पिकविमा योजनेतील घोटाळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या सरकारला जबाबदार धरले. पिकविम्याच्या नावाखाली शेतकर्यांची फसवणूक झाली असून आजही अनेक शेतकर्यांना विम्याची रक्कम मिळालेली नाही, असा दावा त्यांनी केला.

याप्रसंगी खा.डॉ.कल्याण काळे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शहराध्यक्ष अतिक खान, राजेंद्र राख, कल्याण दळे सर्व तालुकाध्यक्ष व मान्यवर उपस्थित होते.




## युवा आदर्श

### मळगंगा माता ...

शिवजटेतून प्रकटे
मळगंगा आदिमाया
कुकडी नदी जवळ
स्थिरावते विसावया
धूमराक्ष राक्षस मारे
संकट मुक्त करावया
सहा बहिणी सहीत
देवी आली रहावया
कुंड माऊली प्रसिद्ध
भक्तावरी करी दया
परिसर नयन रम्यता
भावे भाविक हृदया
नदीत रांजण खळगे
ये चमत्कार पहावया
भूगर्भ शास्त्र अद्भुत
सृष्टीची खरी किमया
छबिना मिरवणुकीत
भक्त लागे नाचावया
घागरी फुकंतात जन
विसरती आपले वया
दर्या बाई वेल्हा बाई
दर्शन देतात चिन्मया
कुंडातील जलपवित्र
असाध्य रोग हरावया
प्राचीन स्वयंभू मुर्त्या
बनवते भक्ता निर्भया
दर्शन घेता महामाया
उजळती कैक समया

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## कृषी उत्पन्न बाजार समितीत अण्णासाहेब पाटील यांचे स्मारक उभारणार - आ. अर्जुनराव खोतकर

### जयंती दिनी आमदार निधीतून चौक सुशोभीकरणाचा शुभारंभ

**जालना | प्रतिनिधी -** मराठा आरक्षण चळवळीचे प्रणेते, मराठ्यांचे क्रांतीसुर्य, माथाडी कामगारांचे दैवत तथा अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक कै. आण्णासाहेब पाटील यांचे कार्य, बलिदान शेतकरी, हमाल, व्यापारी, माथाडी कामगार यांना सदैव स्मरणात राहावे यासाठी जालना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जागा देऊन भव्य - दिव्य स्मारक साकारणार असल्याची घोषणा महाराष्ट्र विधानमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ.अर्जुनराव खोतकर यांनी आज केली.

अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त गुरूवारी (ता. २५) चौकात अभिवादन सभा घेण्यात आली. याप्रसंगी आ. अर्जुनराव खोतकर यांच्या स्थानिक विकास निधीतून चौक सुशोभीकरणाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिवसेना उद्धव ठाकरेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, राजेश राऊत, पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, संतोष गाजरे, विश्वंभर तिरुखे, अशोक पडूळ, करण जाधव, प्रा.सोपानराव तेलगड, संजय देठे, कैलास खांडेभराड, विजय वाढेकर, विजय कमळे, नरेंद्र जांगडे, सागर पाटील, दिनकर घेवंदे, किशोर गरदास, हरेश देवावाले, राहुल हिवराळे, आकाश जगताप, बाळासाहेब देशमुख, डॉ. पोकळे, मंगेश देशमुख, योगेश पाटील, सुरेश पतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. अर्जुनराव खोतकर पान २ वर



## राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत जालन्याची चमक; जिल्ह्याचा मान उंचावला

### चार खेळाडूंची राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड



**जालना | प्रतिनिधी -** ४६ वी महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियनशिप २०२५-२६ ही राज्यस्तरीय कराटे स्पर्धा संभाजीनगर येथे २० व २१ सप्टेंबर रोजी भव्यदिव्य पद्धतीने पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून तब्बल २० जिल्ह्यांचे ७०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. जालना जिल्ह्यातील कराटेपटूंनीही आपली दमदार छाप सोडत घवघवीत यश संपादन केले. जालना जिल्ह्यातून ३३ इव्हेंट्स (काता व कुमिते) मध्ये कराटेपटूंनी सहभाग घेतला. यामध्ये सहा विद्यार्थ्यांनी मेडल पटकावून जिल्ह्याचा मान उंचावला. त्यापैकी चार खेळाडूंची निवड राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निश्चित झाली आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र खेळाडू : कु. निवांशी नवीनकुमार वलकट्टी (नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना Under -10 Yrs Girls, Kata Event - तृतीय क्रमांक कु. तन्वी नितीन खरटमल (नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना) Under -14 Yrs Girls, Kata Event - तृतीय क्रमांक कु. आरुषी नवीनकुमार वलकट्टी (नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना) Under -14 Yrs Girls, Kumite Event - तृतीय क्रमांक यशवर्धन शंकर चिल्का (श्री एम.एस. जैन इंग्लिश स्कूल, जालना) Under -12 Yrs, Kata Event - तृतीय क्रमांक इतर पदकविजेते : कु. दिव्यता अजितराज कोठारी (श्री एम.एस. जैन इंग्लिश स्कूल, जालना) Under -16 Yrs Girls, Kumite Event - तृतीय क्रमांक, कु. पूर्वा सुजित माने (श्रीमती इंदिरा गांधी विद्यालय, रामनगर, जालना) Under -16 Yrs Girls, Kata Event - तृतीय क्रमांक

या सर्व विद्यार्थ्यांना सेन्साई रूपेन्द्र पारचा व सेन्साई अमन पारचा यांचे काटेकोर मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या यशाचे महावीर ढक्का, राहुल मांडोत, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, श्री म स्था जैन इंग्लिश शाळेची मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी, श्री म स्था जैन विद्यालयाचे पान २ वर

### राजमहल ते बायपास रोडची दुरवस्था

## रिक्षा उलटली, वाहने अडकताहेत

### रस्त्याच्या दुरुस्तीची दुर्गेश काठोठीवाले यांची मागणी

**जालना | प्रतिनिधी -** गेल्या आठवडाभरात झालेल्या मुसळधार पावसामुळे जालना शहरातील अनेक भाग पाण्याखाली गेले. सखल भागात पाणी साचून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले. काही पुलांवरून पाणी वाहत असल्याची परिस्थितीही निमाण झाली होती.

या अतिवृष्टीचा फटका राजमहल ते बायपास रोडला मोठ्या प्रमाणात बसला आहे. या मार्गावरील नाल्यावर बांधलेला रस्ता जोरदार पावसामुळे पूर्णपणे खचून गेला आहे. परिणामी या ठिकाणी मोठा खड्डा पडल्याने वाहतूक धोकादायक झाली आहे.

या खड्ड्यात एक मालवाहू रिक्षा उलटल्याची घटना घडली असून अनेक छोटी-मोठी वाहने अडकत असल्याचेही समजते. त्यामुळे नागरिकांना व वाहनधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

यासंदर्भात शिवसेना शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी सांगितले की, राजमहल ते बायपास रोड हा नागरिकांच्या दैनंदिन वापराचा महत्त्वाचा मार्ग आहे. रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की कधीही मोठा अपघात होऊ शकतो. त्यामुळे तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

काठोठीवाले यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर या समस्येकडे तातडीने लक्ष दिले नाही तर शिवसेना रस्त्यावर उतरून आंदोलन छेडेल.

नागरिकांनी देखील याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली असून, अन्यथा वाहतुकीचे हालचाल आणखी विस्कळीत होईल अशी भीती व्यक्त होत आहे.

प्रशासनाच्या वेगवान निर्णयावर आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



# आ.रोहित पवार शेतकऱ्यांच्या बांधावर

## सरसकट पंचनाम्याच्या सूचना, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**कर्जत । प्रतिनिधी -** कर्जत तालुक्यातील अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर आज आमदार रोहित पवार थेट पोहोचले. बेलगाव, मिरजगाव, रवळगाव, कोकणगाव, निमगाव गांगर्डा, गुरवपिंपरी, होलेवाडी, परीटवाडी, करपडी आदी गावांमध्ये गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसाने व सीना नदीच्या पुरामुळे शेतजमिनी वाहून गेल्या, शेतातील उभं पीक पूर्णपणे नष्ट झालं असून शेतकरी बांधवांवर जगण्याचा प्रश्न उभा राहिला आहे. या भीषण परिस्थितीत आमदार पवार यांनी थेट शेतकरी कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या, धीर दिला व तातडीच्या जीवनावश्यक वस्तूंचं वाटप करून संकटात खंबीरपणे उभं राहण्याचं आवाहन नागरिकांना केलं.

आमदार रोहित पवार यांनी वाडी-वस्त्यांवर नुकसान झालेल्या शेतात चिखलातून, पाण्यातून वाट काढत शेतीपिकाच्या नुकसानीची पाहणी केली. ज्या ठिकाणी शेतात थेट पोहोचणं शक्य नव्हतं, तिथे त्यांनी नागरिकांसोबत ट्रॅक्टरवरून प्रवास करत शेतात जाऊन थेट नुकसानीचा आढावा घेतला. शेतकऱ्यांच्या डोळ्यांतले अश्रू, रिकाम्या शिवारातली वेदना आणि भविष्यातील काळजी याची जाणीव करून घेत त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना तातडीने दिलासा देण्यासाठी हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्याची ठाम मागणी राज्य सरकारकडे केली.



आज शेतकरी फक्त पिकाच्या नव्हे तर जगण्याच्या संघर्षात आहे. घोषणांनी नाही, तर रोख मदतीने त्याला उभारी द्या, हेच खरं सरकारचं कर्तव्य आहे, अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या.

या वेळी पंचनामे करत असलेल्या तलाठी व कृषी सहाय्यक अधिकाऱ्यांशी चर्चा करत सरसकट व न्याय्य पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. सरकार कितीही पैसे दिले तरी वाहून गेलेली माती शेतकरी आणणार कुठून? आणि यापुढे शेती करायची कशी? असा थेट सवाल करून त्यांनी सरकारचं लक्ष वेधलं.

याचबरोबर त्यांनी अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे उभं राहिलेलं संकट दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करत त्यांनी शेतकरी बांधवांना खंबीर राहण्याचं आवाहन केलं. या वेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ट्रॅक्टरवरून थेट शेतात...**

अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या शेतांची थेट पाहणी करण्यासाठी आमदार रोहित पवार नागरिकांसोबत ट्रॅक्टरवरून शेतात गेले. गावागावातल्या चिखलातून व पाण्यातून मार्ग काढत ते थेट शेतकरी बांधवांच्या दुःखात सामील झाले. खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा सोबती ठरतो तो संकटाच्या काळात असं चित्र या प्रसंगी दिसून आलं.

**हेक्टरी ५० हजार मदतीची ठाम मागणी**

नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून आमदार रोहित पवार यांनी सरकारकडे सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी ठाम मागणी केली.त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, आज शेतकरी फक्त पिकाच्या नाही तर जगण्याच्या संघर्षात आहे. घोषणांनी नाही तर रोख मदतीने त्याला उभारी द्या, हेच खरं सरकारचं कर्तव्य आहे.

# धनगर समाजाची एसटी आरक्षणात अंबलबजावनी करा अन्यथा परिणाम भोगवे लागतील

## राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला राष्ट्रीय अध्यक्ष सक्षणा सलगर यांचा इशारा

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** राज्यातील धनगर समाजाची एसटी आरक्षणात अंमलबजावणी करावी ही मागणी आजकालची नसून गेल्या वर्षानुवर्षांपासून मागणी सुरू आहे .संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या अमृता पासून धनगर समाजाला गेल्या ७५ वर्षापासून राज्यकर्त्यांनी झुलत तथा वंचित ठेवले आहे .मात्र आता जोपर्यंत धनगर समाजाची एसटीमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत समाज स्वस्थ बसणार नाही असा एल्गार राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला राष्ट्रीय अध्यक्षा सक्षणा सलगर यांनी धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासाठी जालना येथे २४ सप्टेंबर रोजी काढण्यात आलेल्या इशारा मोर्चाप्रसंगी पत्रकारांशी संवाद साधतांना केला .

यावेळी उपोषणकर्ते तथा धनगर योद्धा दीपक बोऱ्हाडे यांच्यासह जाफराबाद, गोंधनखेडा, टेभूर्णी छत्रपती संभाजीनगर, पंढरपूर , अंबड,जालना बदनापूर, धाराशिव यांच्यासह राज्यातील ग्रामीण तथा शहरी भागातील सकल धनगर समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होते .

पुढे बोलताना सलगर म्हणाल्या की लोकसभा विधानसभा निवडणुकीआधी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला होता की सत्तेवर येताच पहिल्याच कॅबिनेटच्या मीटिंगमध्ये धनगर समाजाला एसटीमध्ये आरक्षण देऊ मात्र त्यांचे सरकार सत्तेवर येऊन आज एका वर्षाचा काळ लोटला असून त्यांना धनगर आरक्षणाचा विसर पडला आहे.

मात्र येणाऱ्या काळात जर समाजाला योग्य नाही मिळाला तर समाजामध्ये उद्रेक निर्माण होईल व समाजातील युवक कोणालाही जुमानणार नाही त्यामुळे शासनाने आता वेळ न घालवता तात्काळ योग्य निर्णय घेऊन धनगर समाजाची एसटी प्रवर्गात समावेश करून अंबलबजावणी करून एसटीच्या सर्व सोयी सुविधा समाजाला द्याव्या व गेल्या अनंत काळापासून सुरू असलेली ही धनगर आरक्षणाची लढाई पूर्णत्वास न्यावी जर धनगर बाधवांनी तात्काळ एसटी आरक्षणाची अंमलबजावणी झाली नाही तर गेल्या अनेक वर्षं वर्षापासून समस्याग्रस्त, चिंतातुर,भितीयुक्त, जिवन जगत असलेला समाजबांधव विविध समस्यांनी त्रासलेला असुन त्यांना जर न्याय मिळाला नाही तर त्यांच्या संयमाचा बांध फुटेल व सर्वत्र उद्रेक होईल व नंतर समाजाला आवर घालने ही शासनाला मुश्किलीचे होईल मग शासनाला हे महागात पडेल व त्याची सर्वस्वी जबाबदारी केंद्र तथा राज्य सरकारची राहील म्हणून केंद्र व राज्यात भाजप सत्तेत असल्या



ने धनगर आरक्षणाचा प्रश्न फार काही अवघड जाणार नाही म्हणून आता आमचा अंत पाहू नका व आमच्या आरक्षणाचा प्रश्न तात्काळ निकाली काढावा व धनगर समाज बांधवांना एसटी प्रवर्गात आरक्षण द्यावे अन्यथा परिस्थिती बिकट झाली तर याला सर्वस्वी जबाबदार राज्य केंद्र सरकार राहील .

यावेळी त्यांनी धनगर आरक्षणासाठीची लोकशाही मार्गाने लढाई सुरूच आहे त्यामुळे समाजाला एसटी आरक्षणामध्ये प्रवेश मिळणारच आहे यासाठी मात्र संघटीत रहा, आरक्षणासाठी समाज बांधवांनी आत्महत्या करू नका, आपला कुठेही संयम सुटू देऊ नका , आपलं आंदोलन थांबविण्यासाठी काही लोक उचापत्या करतात मात्र अशा काही इतर समाजकंटकांच्या गैरवर्तणूकीमुळे कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न उद्भवणार नाही याची काळजी घ्या व शांततेच्या मार्गाने आंदोलन करा तो आपला न्यायिक अधिकार आहे म्हणून त्याच्यासाठी प्रचंड लढा व आपल्या हक्क अधिकार लोकशाहीच्या मार्गाने मिळवा असे आवाहनही त्यांनी समाज बांधवांना केले .

# जवाहर माध्यमिक विद्यालयाचे कुस्ती स्पर्धेत यश



**विशाल देशमुख**

**टेभूर्णी -** जवाहर माध्यमिक विद्यालय, वाडी बु. चा विद्यार्थी रितेश कडूबा जाधव आणि गुरुकुल प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, क्षीरसागर चे पहिलवान भागवत आबासाहेब भोसले, पवन निवृत्ती भोसले, युवराज शिवनाथ भोसले, निकिता रामकिसन बैनाडे यांनी तालूकास्तरीय कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कुस्तीचे प्रदर्शन करून प्रतिस्पर्धी पहिलवानांना आस्मान दाखवत एकतर्फी विजय मिळवला व जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी पात्र झाले. त्याबद्दल सर्व खेळाडू चे संस्थेचे सचिव मा.सभापती लक्ष्मणराव पाटील दळवी अध्यक्ष श्री योगेश पाटील दळवी संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्य श्री पंढरीनाथ शिंदे सर व क्रीडा शिक्षक श्री भरत सिरसाट, श्री मंगेश रगडे सर प्रशासकिय अधिकारी आनंद वाघ यांनी पहिलवानांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.

# मंत्री मंगलप्रभात लोढा यांचा आज जालना दौऱ्यावर

**जालना -** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असुन त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीप्रमाणे शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०२५ दुपारी १.५५ वाजता हुतात्मा जनार्धन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे आगमन. दुपारी २.00 वाजता इन्क्युबेशन सेंटरच्या उद्धाटनास मुख्य अतिथी म्हणुन उपस्थिती. दुपारी ३.00 वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथील जागेवर झालेल्या अतिक्रमण विषया संदर्भात बैठक दुपारी ३.३0 वाजता शॉर्ट टर्म कोर्सबाबत जालना जि.व्य.शि.प्र. विभागाची बैठक.सायंकाळी ४.३0 वाजता पुरग्रस्त शेतकऱ्यांची भेट. स्थळ - मु. पो. शेलगाव, ता. बदनापूर, जि. जालना सायंकाळी ५.00 वाजता मु. पो. शेलगाव, ता. बदनापुर जि. जालना येथून छत्रपतीसंभाजीनगरकडे प्रयाण.

# टिईटी ही व्यावसायिक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करण्याच्या अनिवार्यतून सूट द्या - शेख अब्दुल रहीम

## या निर्णयावर फेर विचार व्हावा यासाठी याचिका दाखल करावी; हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन ची मागणी!

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** टिईटी (TET) ही व्यवसायीक पात्रता परीक्षा शिक्षकांनी उत्तीर्ण करण्याच्या अनिवार्यतून सुट मिळावी तसेच राज्य शासनाने इतर राज्य प्रमाणे निर्णयावर फेर विचार व्हावा यासाठी याचिका दाखल करावी अशी मागणी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे शेख अब्दुल रहीम सर यांनी २२ सप्टेंबर २५ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे साहेब, महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री मा.ना. दादा भुसे साहेब यांना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे थेट मंत्रालयात निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमुद करण्यात आले आहे कि, मा. सर्वोच्च न्यायालयातील नागरी अपील क्र. १३८५/२०२५ व इतर अपीलांवरील निर्णय दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी घोषित करण्यात आला. या निर्णयानुसार प्राथमिक व माध्यमिक अनुदानित तथा विना अनुदानित शाळांतील (इयता १ ते ८) 'टी ई टी' अपात्र शिक्षकांना दोन वर्षात परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अन्यथा त्यांना सेवेतून वगळण्यात येईल, अशी तरतूद झाली आहे. ही सक्ती सेवा निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या, २०-२५ वर्षे यशस्वी अध्यापन केलेल्या नियुक्तीवेळी आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या परंतु परीक्षा देण्याची तयारी करण्याची सवय गमावलेल्या शिक्षकांना अन्यायकारक ठरत आहे. ५% पेक्षाही कमी निकाल असलेल्या टी ई टी परीक्षेतील अपयशामुळे आयुष्यभर अध्यापन केलेल्या शिक्षकांचे सेवा हक्क धोक्यात आले आहेत...

पार्श्वभूमी व कायदेशीर मुद्यांचा विचार करून... आर टी ई, २००९ मध्ये प्रस्तावित सुधारणा केंद्र शासनास प्रस्ताव द्यावा की, कलम २३ मध्ये पुढीलप्रमाणे उपकलम (३) समाविष्ट करण्यात बाबत, तात्पुरती उपाययोजना संसदेत सुधारणा मंजूर होईपर्यंत केंद्र शासनाने वटहुकूम काढून वरील तरतूद तातडीने लागू करावी. शिक्षक हे समाजाचे मार्गदर्शक आहेत. त्यांचे अनेक वर्षांचे अनुभव व कार्य दुर्लक्षित करून केवळ 'टी ई टी पात्रतेवरून सेवा समाप्ती करणे हे अन्याय्य व शिक्षण व्यवस्थेस हानीकारक ठरेल. राज्य शासन व केंद्र शासनाने शिक्षकांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.



**कायदेशीर व शैक्षणिक मुद्दे** राष्ट्रीय अद्यापक शिक्षा परिषदेची अधिसूचना (दि. २३ ऑगस्ट २०१०) या अधिसूचनेनुसार त्या तारखेपूर्वी नियुक्त झालेले शिक्षक 'टी ई टी' या अर्हतेमधून मुक्त आहेत. राज्य शासनाचा शासन निर्णय (दि. १३ फेब्रुवारी २०१३) या निर्णयानुसार १३ पेब्रुवारी २०१३ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक 'टी ई टी' पात्रतेपासून वगळले आहेत. आर टी ई, २००९ मधील कलम २३ उपकलम (१) नुसार शिक्षकांनी किमान शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता प्राप्त करणे अपेक्षित आहे. परंतु उपकलमात स्पष्ट तरतूद आहे की अधिनियमाच्या प्रारंभी कार्यरत असलेल्या शिक्षकांनी ही अर्हता ५ वर्षांत संपादित करावी. राष्ट्रीय परिषदेच्या अधिसूचनेनुसार, त्या आधी नियुक्त शिक्षकांना 'टी ई टी' सक्ती लागू होत नाही. नैसर्गिक न्याय व सेवा हक्क अनेक वर्षे मुलभूत शिक्षण पुरवणाऱ्या शिक्षकांना अचानक सेवेबाहेर करणे हे त्यांच्या मूलभूत हक्कांवर (Article १४ व २१, भारताचे संविधान) आघात करणारे ठरते.

# मुस्कान कॅरम क्लब व रॉयल बादशाह ग्रुपच्या खुल्या सिंगल कॅरम स्पर्धेचे उदघाटन



**जाफराबाद । प्रतिनिधी** - जाफराबादमध्ये मुस्कान कॅरम क्लब व रॉयल बादशाह ग्रुप आयोजित खुल्या सिंगल कॅरम स्पर्धा चे उद्धाटन क्रीडा क्षेत्रातील विशिष्ट व्यक्ती जहीर टेलर यांच्या हस्ते संपन्न झाले.

या उदघाटन समारंभाला काँग्रेस नेते जहीर यारखान, नगराध्यक्ष शेख सउद, नगरसेवक शेख मुजीब, रा. काँग्रेस पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. अमर शेख, मुकुंदा पाटील, बाबुभाई, रा. काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष शेख मुजफ्फर, मुजीब भाई खान, मुश्ताक भाई, रईस भाई, परवेज भाई, अश्फाक भाई, शेरा भाई, फारुक भाई, जविद भाई, तसेच स्थानिक खेळाडू आणि क्रीडा प्रेमी उपस्थित होते.

खुल्या सिंगल कॅरम प्रकारात आयोजित ही स्पर्धा स्थानिक तसेच जिल्ह्यातील खेळाडूंना सहभागी होण्याची संधी देते. स्पर्धा कौशल्य, तंत्रसाधना आणि सामरिक बुद्धिमत्तेवर आधारित असून, नवोदित व अनुभवी खेळाडूंना एकत्र आणण्याचे उद्दिष्ट आहे. स्थानिक राजकीय आणि सामाजिक नेत्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला उत्साह आणि बळकटी मिळाली. आयोजकांनी सांगितले की, अशा स्पर्धांमुळे स्थानिक युवा वर्गामध्ये क्रीडा क्षेत्रातील रुची वाढेल. भविष्यात या स्पर्धेचे जिल्हा व राज्यस्तरीय स्तरावर आयोजन करण्याचा मानस आहे.

जाफराबादमध्ये ही स्पर्धा क्रीडा क्षेत्रात युवामनाचे स्फूर्ती स्थान निर्माण करीत असून, स्थानिक समुदायासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. क्रीडा कौशल्य, सामाजिक एकात्मता आणि राजकीय उपस्थिती यामुळे हा कार्यक्रम शहरातील क्रीडा संस्कृतीसाठी मोलाचा ठरतो.

झाडे लावा झाडे जगवा

# आडिवर्याची श्री महाकालीदेवी नवरात्रोत्सव

**राजापूर । प्रतिनिधी -** श्री महाकालीदेवी नवरात्रात येथे मोठा उत्सव असतो. नऊ दिवस यात्रा आणि शेवटी विजया दशमी साजरी केली जाते.देवीला वस्त्रालंकार आणि आभूषणांनी सजवली जाते.

श्री योगेश्वरी ,श्री महालक्ष्मी,श्री महाकाली,श्री महासरस्वती आणि श्री रवळनाथ अशा पाच देवतांची मंदिरे येथे आहेत. सर्व प्रथम परिसरातील नगरेश्वराचे दर्शन प्रथम घ्यावे.नंतर,श्री महालक्ष्मी,त्यानंतर , श्री देव रवळनाथ, तद्नंतर श्री महाकाली आणि महासरस्वतीचे दर्शन घेण्याची प्रथा आहे.भक्तांच्या नवसाला पावणारी देवी म्हणून देवस्थानाची ख्याती आहे.आडिवरे श्री महाकाली मंदिर राजापूर पासून २८ किलोमीटर आणि रत्नागिरीपासून ३४ किलोमीटर दूरवर आहे.इ.स.१३२४ मध्ये हे महापीठ अस्तित्वात आले.आद्य शंकराचार्यांनी याची स्थापना केली असे मानण्यात येते. या प्राचीन मंदिराला श्री छत्रपती शिवाजी महाराज, कान्होजी आंग्रे,समर्थ रामदास स्वामी यांनी भेट देऊन दर्शन घेतल्याचे पुरावे सापडतात. आडिवर्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत प्रसिद्ध देवस्थान मंदिरांचे मोठे योगदान आहे. सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ पासून शारदीय नवरात्रोत्सवाची सुरुवात झाली आहे.श्री महाकाली देवस्थान जागृत ऐतिहासिक पवित्र श्रद्धास्थान आहे.रविवार व साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी आणि उत्सव कालावधीत भक्तगण मोठ्या संख्येने दर्शनास येतात. मंदिर, समाज शिक्षणाचे माध्यम असे मानले जाते.श्री महाकाली मंदिर विश्वस्त मंडळाने हे तत्व कायम पाळले आहे.पारंपरिक सण,व्रत,उत्सव आदी साजरे करताना आडिवरे पंचक्रोशीच्या सर्वांगीण विकासाकरिता ,उन्नतीकरिता महत्त्वपूर्ण योगदान ठरू शकतील असे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व क्रीडाविषयक विविध उपक्रम व कार्यक्रम विविध उत्सवाच्या निमित्त आयोजित करण्यात येतात. भक्तगण, दानशूर भक्तगण यांनी देवीच्या चरणी अर्पण केलेल्या देणगीतून मंदिरातील नित्य उपक्रम नवनवीन सुधारणा करण्यात येतात. या वर्षापासून रोज मोफत खिचडी प्रसाद वाटप सुरू करण्यात आला आहे. तसेच भविष्यात मंदिर आवाराचे सुशोभीकरण, नवनवीन बहु उद्देशीय सभागृह,भक्त निवास, उद्यान विकसित करणे,जेष्ठ नागरिक कट्टा सुरु करण्याचा मंदिर व्यवस्थापनाचा मानस आहे.मंदिराच्या नियोजित संकल्पनात भक्तगणांनी,दानशूर भक्तगणांनी, उद्योजकांनी सहभागी होऊन सहकार्य करावे असे मंदिर व्यवस्थापनाने आवाहन केले आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेला मोठे भगदाड! केंधळी व नेर येथील मुस्लिम पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

# विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाचा स्वागतच- आमदार लोणीकर

### लोणीकर पिता-पुत्रांच्या विकास कामांवर विश्वास; इतर पक्षात संधी आणि सन्मान मिळत नसल्याची प्रवेशकर्त्यांची खंत

**परतूर । प्रतिनिधी -** भाजपचे दरवाजे राष्ट्राच्या आणि राज्याच्या विकासासाठी काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी खुले आहेत. आज प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत आहे. भारतीय जनता पक्षाच्या माध्यम ातून आपल्या गावाचा तालुक्याचा पर्यायाने देशाच्या विकासासाठी प्रत्येकाने हातभार लावावा अशी भावना या प्रवेशावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी म हाराष्ट्राच्या राजकारणात मोठा उलटफेर झाला आहे. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या पक्षांना मोठा धक्का बसला असून, त्यांच्या शेकडो निष्ठावान कार्यकर्त्यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे सत्ताधारी भाजपने विरोधी पक्षांच्या गडाला मोठे भगदाड पाडले आहे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या विकास कामांवर प्रभावित होऊन लोणीकरांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत भारतीय जनता पक्षात प्रवेश करत असल्याचे प्रवेशकर्त्यांनी सांगितले.

मंठा तालुक्यातील केंधळी व जालना तालुक्यातील नेर येथील पदाधिकाऱ्यांनी आज भारतीय जनता पार्टी प्रवेश केला यासाठी जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव बोराडे उपसभापती नागेशराव घारे, तालुका अध्यक्ष विक्रम उभार युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष गजानन उफाड, पंडितराव घारे जगन्नाथ घारे यांनी पुढाकार घेतला होता. यावेळी शत्रुघ्न कणसे, संपत टकले, रमेश भापकर, ज्ञानेश्वर शेजुळ यांची प्रमुख उपस्थिती होती केंद्र व राज्यातील भाजप सरकारच्या विकासात्मक धोरणांवर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार बबनराव लोणीकर भाजपा महाराष्ट्र प्रदेशाची राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर त्यांचा पूर्ण विश्वास असून केवळ घोषणा न करता, प्रत्यक्ष कामे होत असल्यामुळे भाजपमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना मध्ये स्थानिक पातळीवर प्रभावी नेतृत्वाचा अभाव जाणवत आहे. या पक्षांमध्ये कार्यकर्त्यांना योग्य सन्म ान व संधी मिळत नसल्याची खंत देखील प्रवेशकर्त्यांनी व्यक्त केली.

आमदार बबनराव लोणीकर व भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपची मजबूत संघटनशक्ती आणि कार्यकर्त्यांना मिळत असलेला सन्मान पाहून आपण भाजपसोबत काम करण्याचा निर्णय घेतला असेही यावेळी प्रवेश करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या प्रवेशामुळे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. या शेकडो कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे भाजपची जमिनीवरील पकड अधिक मजबूत झाली असून, आगामी निवडणुकांमध्ये भाजपला याचा मोठा फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



यावेळी केंधळी येथील शुभम घारे योगेश राऊत अंकुश बनसोडे निलेश देशमाने सौरभ घारे पुंजाराम चौधरी शिरीष घारे विकास घारे कृष्णा काकडे योगेश चौधरी गजानन गाढवे ज्ञानेश्वर घारे महेश घारे संदीप चौधरी सोपान सुरडकर दिनेश घारे आदित्य घारे रामदास खरड नवनाथ घाटे विकास घारे बाळासाहेब आमटे दिग्विजय अवचार सोमेश घारे शिवराज घारे किशोर चौधरी संतोष खताळ श्रीनिवास खरड तुषार बनसोडे मंगेश घारे ज्ञानदेव वायाळ दत्ता पडूळ बळी मिरगे राजेश राऊत अक्षय राठोड कृष्णा राठोड राजेश चव्हाण रंजीत राठोड मिथुन राठोड नितीन राठोड रवी राठोड प्रवीण चव्हाण रोहित जाधव जीवन चव्हाण राहुल राठोड संदीप राठोड रमेश चव्हाण रवी राठोड यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टी प्रवेश केला.

**नेर येथील मुस्लिम बांधवांचा भाजपात प्रवेश**

बाबा भाई शेख बाबा भाई पठाण अलीम शेख अकबर शेख जमीर शेख इस्माईल पठाण शकील शेख हुसेन सय्यद मुक्तार शेख आरशात पठाण आयास पठाण इमरान शेख सलमान शेख अरबाज पठाण साजिद पठाण सिकंदर मौलाना पाशा शेख रामभाऊ तांदळकर रफिक मौलाना यांच्यासह अनेक मुस्लिम बांधवांनी देखील भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

## परतूरमध्ये सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप रुपालीताई सवने यांच्या किर्तनाचे आयोजन

**परतूर । प्रतिनिधी -** शहरातील आदर्श कॉलनी येथे दि २६ सप्टेंबर २०२५ रोजी शुक्रवारी रात्री आठ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार व समाजप्रबोधनकार, झी टॉकीज फ ेम हभप रुपालीताई रामेश्वर महाराज सवने यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक वैशाली दिंगबरराव वाघ यानी दिली आहे.



नवरात्र उत्सव समितीच्या वतीने या भव्य किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हभप रुपालीताई सवने महाराज यांच्या प्रभावी वाणीतून समाजप्रबोधन आणि भक्तीरसाची अनुभूती घेण्याची सुवर्णसंधी परतूरकरांना मिळणार आहे.

तरी शहरातील व तालुक्यातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या किर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक वैशाली दिंगबरराव वाघ व श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान नवरात्र महोत्सव कमिटी आदर्श कॉलनी परतूर यांनी केले आहे.

## मंत्री उदय सामंत यांचा जालना जिल्हा दौरा

**जालना -** उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी जालना जिल्हा दौऱ्यावर येत असुन त्यांचा जालना दौरा कार्यक्रम पुढीप्रमाणे सकाळी ११.00 वाजता जालना शहर व ग्रामीण अतिवृष्टीमुळे बाधीत भागाची व औद्योगिक क्षेत्राची पाहणी. दुपारी ४.00 वाजता जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण.

आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये महायुतीचा झेंडा फडकवा -आ. कुचे

## सेवा पंधरवाडा अभियान जिल्हा स्तरापासून ते बूथ स्तरापर्यंत यशस्वीपणे राबवून या अभियानात जालना क्रमांक एक वर आणा - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जन संघाचे अखिल भारतीय सरचिटणीस पंडित दीनदयाळ उपाध्ये व माथाडी कामगार नेते स्व.आण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे वरील दोन्ही ही महापुरुषांची जयंती आज (दि.२५ सप्टेंबर) रोजी प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अभिवादन करून साजरी करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात मा.आ. नारायण कुचे कार्यकर्त्यांना आवाहन केले की, आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये महायुतीचा झेंडा फडकवा व जालना महानगर जिल्ह्यासह जालना जिल्ह्यात सर्व मंडळात भारतीय जनता पक्ष क्रमांक एक वर राहील यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आजपासून काम ाला लागून जिल्हा भाजपमय करावा असे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, भाजपा जेष्ठ नेते शिवाजीराव थोटे, माजी म हानगर जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर, सतीश जाधव, युवा नेते अक्षय भैया गोरंट्याल, संतोष लोखंडे, साहेबराव कानडजे, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ. शुभांगीताई देशपांडे, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षा सौ. संध्याताई देठे, सरचिटणीस अरुणाताई जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल कोलते, भाजपा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सोपान पेंढारकर, सिद्धिविनायक मुळे इत्यादीसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, भाजपा चा सेवा पंधरवाड्यामध्ये दिलेले सर्व कार्यक्रम कार्यकर्त्यांनी जिल्हा स्तरापासून मंडळ स्तर व बूथ स्तरापर्यंत यशस्वीपणे राबवून संघटनात्मक दृष्टया भारतीय जनता पक्ष जालना जिल्ह्यासह महाराष्ट्रामध्ये या अभियानात क्रमांक एक वर न्यावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, भाजपा महानगर उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, प्रा.राजेंद्र भोसले यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय तसेच स्व.आण्णासाहेब पाटील यांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकणारे सविस्तर असे म ार्गदर्शन केले.

यावेळी माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, अमोल धानुरे, संजय डोंगरे, संजय आटोळे, पुरुषोत्तम उढाण, सरचिटणीस सुनील पवार, गोविंद ढेंबरे, जिल्हा चिटणीस राजू साळवे, नगरसेवक शशिकांत घुगे, रमेश गौरक्षक, जिवन सले, अमोल कारंजेकर, परीक्षित शिंदे, द्वारकासेठ जाधव, सुभाष सले, अनिल सरकटे, आढावे, बद्री वाघ, डोंगरसिंग साबळे, दौलत भुतेकर, महेश मुळे, सेवकराम नारियलवाले,




नंदकिशोर गरदास, विठ्ठलसिंग राणा, शंकर लामगे, दीपक ठाकूर, बाबा उगले, रवी अग्रवाल, राजू गवई, वर्षा ठाकूर, मंदाताई पवार, वैशाली बनसोडे, दिपाली विन्नीवाले, वंदना ढगे, शितल तनपुरे, गजानन खरात, भाऊसाहेब काकडे, बाबुराव भवर, राम लाल जाधव, काकासाहेब घुले, गणेश जल्लेवार, राजाराम जाधव, सतीश केळकर, जगदीश येनगुपटला, हरिभाऊ गोरे, नागेश अंभोरे, प्रशांत श्रीराम वाघ, रमेश शहाणे, सुदर्शन काळे, कल्याण काळे, निलेश गवळी, कैलास उबाळे, विष्णू डोंगरे, उद्धव ढवळे, कृष्णा गायके, संतोष खंडेलवाल, योगेश शिमगे आदींची उपस्थिती होती.

## गुंठेवारी विकास अधिनियम; बांधकाम नियमान्वित करण्यासाठी अंतिम मुदत वाढवली

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (नियमाधीन करणे, श्रेणीवाद व नियंत्रण) अधिनियम, २०२१ च्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेल्या अनधिकृत भुखंड व बांधकाम नियमान्वित करण्यासाठी मुदतवाढ जाहीर केली आहे. याअंतर्गत नागरिकांना ३० जून २०२६ पर्यंत प्रस्ताव दाखल करण्यास सांगितले आहे.

महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीतील क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भाग या नियमाअंतर्गत येतो. नागरिकांनी सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सहायक संचालक, नगर रचना जालना यांच्याकडे नोंदणीकृत आर्किटेक्ट/इंजिनियरच्या माध्यमातून दाखल करणे आवश्यक आहे. मुदतीत प्रस्ताव न दिल्यास, अवैध बांधकाम पाडण्याची कार्यवाही केली जाईल.

सर्व नागरीकांनी या मुदतीत प्रस्ताव नोंदवून कायदेशीर मान्यता प्राप्त करणे आवश्यक आहे. प्राधिकृत अधिकारी (गुंठेवारी कक्ष) व उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांनी हे सूचना प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिल्या आहेत.

जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अवैध भुईखुंड व बांधकामावर कायदेशीर नियंत्रण ठेवण्यासाठी ही मुदतवाढ महत्त्वाची आहे. नागरिकांनी वेळेत प्रस्ताव दाखल करून कायद्याचा लाभ घेणे आवश्यक आहे, अन्यथा पाडण्यात येणाऱ्या बांधकामामुळे आर्थिक आणि सामाजिक दोन्ही तोटे संभवतात.

## जिल्ह्यात जादुटोणा विरोधी कायदा प्रचार समितीसाठी प्रस्ताव मागवले

**जालना** - जिल्ह्यात जादुटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसिध्दी समिती स्थापण्यात आली आहे. जिल्हा समन्वयक (विना मोबदला) नेमण्यासाठी महिला-पुरुष नागरिकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. प्रस्ताव १० ऑक्टोबर २०२५ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे दाखल करावेत. प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे व पोलिस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. सहायक आयुक्त, समाजकल्याण, राजु एडके यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की त्यांनी वेळेत प्रस्ताव सादर करावेत.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.